व्यवस्थापन-विद्या परिषदेकडून प्रस्ताव

# कुलगुरू निवड समितीत नांगिया यांचे नाव निश्चित

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरू निवडीची प्रक्रिया सुरू झाली आहे. त्यातील निवड समितीवर पाठविण्यासाठी विद्यापीठाच्या व्यवस्थापन व विद्या परिषदेने प्रा.



अश्विनीकुमार नांगिया यांचे नाव गुरुवारी निश्चित केले आहे. नांगिया हे पुणे येथील राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेच्या संचालकपदी कार्यरत आहेत.

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांची मुदत जूनमध्ये संपणार आहे. पुढील पाच वर्षांसाठीच्या नव्या कुलगुरूंच्या निवडीची प्रक्रिया सुरू झाली आहे. त्याअंतर्गत त्रिसदस्यीय निवड समितीवर पाठविण्यात येणाऱ्या एका सदस्य निवडीसाठी व्यवस्थापन परिषद व विद्या

> विद्यापीठाच्या व्यवस्थापन, विद्या परिषदेने संयुक्त बैठक घेऊन कुलगुरू निवड समितीवर विद्यापीठाच्यावतीने पाठविण्यात येणाऱ्या एका सदस्याचे नाव निश्चित केले आहे. या सदस्याला त्याची माहिती देऊन त्यांनी ही निवड स्वीकारल्याचे विद्यापीठाला कळविणे आवश्यक आहे. त्यांनी निवड स्वीकारल्यानंतर त्यांचे नाव कुलपती कार्यालयाला कळविण्यात येणार आहे.
>
> - डॉ. विलास नांदवडेकर, कुलसचिव

## विद्यापीठ कायद्यानुसार समितीची स्थापना



या निवडीसाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा कलम ११ (३) नुसार समिती स्थापन करावी लागते. सर्वोच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायाधीश किंवा उच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त मुख्य न्यायमूर्ती किंवा राष्ट्रीय कीर्तीचा ख्यातनाम विद्याव्यासंगी किंवा शैक्षणिक क्षेत्रामध्ये पद्म पुरस्कारप्राप्त व्यक्तीची या समितीच्या अध्यक्षपदी निवड होते. त्यांचे नामनिर्देशन कुलपती करतात. उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे प्रधान सचिव किंवा प्रधान सचिवांच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेला कोणताही अधिकारी हा पदसिद्ध सदस्य असतो. त्यांचे नामनिर्देशन राज्य शासनाकडून केले जाते. विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद आणि विद्या परिषद यांच्या संयुक्त बैठकीतून एक सदस्य या समितीवर पाठविला जातो.




# कुलगुरू निवड त्रिसदस्यीय समितीवर डॉ. ए. के. नानगिया

**कोल्हापूर (पुढारी वृत्तसेवा) :** शिवाजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन आणि विद्या परिषदेच्या बैठकीत कुलगुरू निवड प्रक्रियेअंतर्गत त्रिसदस्यीय निवड समितीवर पुण्याच्या नॅशनल केमिकल लॅबोरेटरीचे संचालक प्रो. डॉ. ए. के. नानगिया यांचे नाव निश्चित करण्यात आले आहे. विद्यापीठात गुरुवारी व्यवस्थापन परिषद आणि विद्या परिषदेची संयुक्त बैठक झाली. यात विविध विषयांवर चर्चा झाली. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या पदाची मुदत जून महिन्यात संपणार आहे. त्या पार्श्वभूमीवर विद्यापीठ प्रशासनाकडून कुलगुरू निवडीची प्रक्रिया सुरु झाली आहे.



सकाळ

# सेवक संघाच्या जडणघडणीत सर्वांचा वाटा

## बाबा सावंत ; व्ही. आर. पाटील स्मृतिदिनी मेळावा





**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ सेवक संघाच्या सभासद मेळाव्यात बोलताना रमेश पोवार.**

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २३ : शिवाजी विद्यापीठ सेवक संघाच्या जडणघडणीत सर्वांचा सिंहाचा वाटा असल्याचे अध्यक्ष बाबा सावंत यांनी आज येथे सांगितले. सेवक संघाचे संस्थापक अध्यक्ष व्ही. आर. पाटील यांच्या २२ व्या स्मृतिदिनानिमित्त झालेल्या सभासद मेळाव्यात ते बोलत होते. वि. स. खांडेकर भाषाभवनमध्ये आयोजन केले होते. दरम्यान, श्री. पाटील यांना सेवक संघाच्या कार्यालयात आदरांजली वाहण्यात आली. त्यानंतर सुश्राव्य गीत, भजन, गायनाचा कार्यक्रम झाला.

श्री. सावंत यांनी सेवक संघाच्या वाटचालीत श्री. पाटील यांच्या योगदानाची माहिती देत जडणघडणीत सर्वांचा वाटा असल्याचे स्पष्ट केले. तत्पूर्वी, अक्युप्रेशर तज्ज्ञ डॉ. अविनाश पालके यांनी अक्युप्रेशरच्या माध्यमातून शरीराची ठेवण, शरीराची घ्यावयाची काळजी व त्यावरील उपाय याचे पॉवर पॉइंट प्रेझेंटेशनद्वारे सादरीकरण केले.

आजारांवर कसा व कोणत्या प्रकारे घरच्या घरी ॲक्युप्रेशरच्या सहाय्याने उपचार करावेत, याची माहितीही त्यांनी दिली. माजी अध्यक्ष रमेश पोवार, संभाजी जगदाळे, शिवाजी ढवण, आर. बी. पाटील, रामदास निकम यांनी सेवक संघाविषयी कृतज्ञता व्यक्त केली.



कोल्हापूर : सेवानिवृत्त सेवकांच्या मेळाव्यात बोलताना सेवक संघाचे अध्यक्ष बाबा सावंत. सोबत रमेश पवार, संभाजी जगदाळे आदी.

# विद्यापीठ सेवक संघाच्या जडणघडणीत माजी सेवकांचे मोठे योगदान : सावंत

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ सेवक संघाच्या जडणघडणीत माजी सेवकांचा मोठा वाटा व योगदान आहे, असे प्रतिपादन सेवक संघाचे अध्यक्ष बाबा सावंत यांनी केले.

विद्यापीठातील वि. स. खांडेकर भाषा भवन सभागृहात आयोजित शिवाजी विद्यापीठ सेवक संघाच्या वतीने आयोजित सेवानिवृत्त सेवकांच्या मेळाव्यात ते बोलत होते. सकाळी शिवाजी विद्यापीठ सेवक संघाचे संस्थापक अध्यक्ष व्ही. आर. पाटील यांचा २२ व्या स्मृतिदिनानिमित्त सेवक संघ कार्यालयात आदरांजली वाहण्यात आली.

दुपारच्या सत्रात झालेल्या मेळाव्यात ॲक्युप्रेशरतज्ज्ञ डॉ. अविनाश पालके यांनी शरीराची ठेवण, शरीराची घ्यावयाची काळजी व त्यावरील उपाय याचे प्रात्यक्षिकाद्वारे मार्गदर्शन केले. यावेळी सेवक संघाचे माजी अध्यक्ष रमेश पवार, संभाजी जगदाळे, शिवाजीराव ढवाण, आर. बी. पाटील, रामदास निकम आदी उपस्थित होते.

# विद्यापीठात नेताजी जयंती

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात गुरुवारी नेताजी सुभाषचंद्र बोस यांची जयंती साजरी करण्यात आली. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे व प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते नेताजींच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, व्ही. टी. पाटील, डॉ. आर. व्ही. गुरव, डॉ. ए. एम. गुरव, डॉ. आर. के. कामत, डॉ. पी. एन. वासंबेकर, नंदा पारेकर, अवनिश पाटील आदी उपस्थित होते.

# प्रशिक्षण कार्यशाळा

कोल्हापूर : विद्यापीठाचा सांख्यिकी कक्ष आणि छत्रपती शाहू इन्स्टिट्युट ऑफ बिझनेस एज्युकेशन ॲण्ड रिसर्चच्यावतीने प्रशिक्षण कार्यशाळा घेण्यात आली. अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रमांतर्गत कार्यशाळा झाली. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के प्रमुख उपस्थित होते. सायबरचे संचालक डॉ. प्रदीप वायचळ अध्यक्षस्थानी होते.

# विद्यापीठात दीक्षान्त समारंभाची तयारी जोरात

## रंगरंगोटी, पत्रिका व पदवी प्रमाणपत्रांची छपाई सुरू

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाचा ५६ दीक्षान्त समारंभ गुरुवार ६ फेब्रुवारी रोजी होणार आहे. त्या पार्श्वभूमीवर विद्यापीठ प्रशासनाकडून तयारी जोरात सुरू झाली आहे. रंगरंगोटी, पदवी प्रमाणपत्र व आमंत्रण पत्रिकांची छपाई सुरू झाली आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ नुसार विद्यापीठाचा दीक्षान्त समारंभ सहा फेब्रुवारी रोजी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून विद्यापीठ अनुदान आयोगाचे (यूजीसी) उपाध्यक्ष प्रा.डॉ. भूषण पटवर्धन यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे.

दीक्षान्त समारंभाची तयारी परीक्षा विभागाच्या वतीने सुरू झाली आहे. विविध समित्यांची स्थापना करून त्यांचे कामकाज गतीने पुढे चालले आहे. यावर्षी ६० हजारांहून अधिक पदवी प्रमाणपत्र प्रदान करण्यात येणार आहेत. विद्यापीठात मुख्य प्रशासकीय इमारतीसह परीक्षा विभाग व अन्य इमारतींचे रंगकाम करण्यात येत आहे. त्याचबरोबर रस्त्यांची डागडुजी सुरू झाली आहे. विद्यापीठातील सर्वच विभागांच्या दीक्षान्त समारंभाच्या अनुषंगाने कामकाज वेगाने सुरू असल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे यांनी दिली.




**कोल्हापूर : परीक्षा भवनच्या इमारतीवर मोठ्या आकारात लावण्यात आलेला विद्यापीठाचा लोगो (छाया : पप्पू अत्तार)**

# युवकांना स्वावलंबी करण्यासाठी ग्रामीण अभ्यासक्रम हाच एकमेव मार्ग

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये कृषी व ग्रामीण क्षेत्राचे स्थान सर्वोच्च आहे. सद्य:परिस्थितीमध्ये देशात बेरोजगारीचा प्रश्न गंभीर होत आहे. युवकांना स्वावलंबी बनविण्यासाठी ग्रामीण अभ्यासक्रम हा एकमेव मार्ग असल्याचे प्रतिपादन प्रा. प्रसाद दावणे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटमधील मास्टर ऑफ रुरल स्टडीजमार्फत 'ग्रामीण अभ्यासक्रमामधील करिअरच्या संधी' या विषयावर आयोजित एकदिवसीय कार्यशाळेत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटचे प्र-संचालक डॉ. प्रकाश पवार होते.

प्रा. दावणे म्हणाले, पदवी प्राप्त केलेल्या युवकांपुढे आज कोणत्या क्षेत्रात करिअर करायचे व त्यासाठी कोणते शैक्षणिक अभ्यासक्रम निवडायचे, याबाबत फारशी माहिती नाही. शिवाय ग्रामीण भागातील युवकांना याबाबत योग्य मार्गदर्शन मिळत नाही; परंतु ग्रामीण अभ्यासक्रमाच्या माध्यमातून युवकांना स्वयंरोजगार, उद्योग, स्पर्धा परीक्षा, संशोधन व शिक्षण यासारख्या क्षेत्रांत करिअरच्या मोठ्या प्रमाणात संधी उपलब्ध आहेत.

कार्यशाळेत यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटमधील डॉ. एम. एस. देशमुख, डॉ. संतोष सुतार, डॉ. कविता वड्राळे, डॉ. विशाल ओव्हाळ, डॉ. तानाजी घागरे यांनी ग्रामीण अभ्यासक्रमातील विविध विषयांवर मांडणी केली.



**कोल्हापूर : विद्यापीठात आयोजित एकदिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी प्रा. प्रसाद दावणे, डॉ. प्रकाश पवार, डॉ. एम. एस.देशमुख, डॉ. कविता वड्राळे आदी.**



**शिवाजी विद्यापीठातून...**

# राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त उद्या कार्यक्रम

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त शनिवार, दि. २५ जानेवारी रोजी जिल्हा प्रशासनाच्या वतीने राष्ट्रीय मतदार दिनाचा मुख्य कार्यक्रम सकाळी ९.३० वाजता शाहू स्मारक भवन येथे आयोजित केला आहे. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे उपस्थित राहणार असून, अध्यक्षस्थान जिल्हाधिकारी दौलत देसाई हे भूषविणार आहेत. आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी, मुख्य कार्यकारी अधिकारी अमन मित्तल, पोलीस अधीक्षक डॉ. अभिनव देशमुख आणि प्रभारी अपर जिल्हाधिकारी भाऊ गलांडे आदी उपस्थित राहणार असल्याची माहिती उपजिल्हाधिकारी सतीश धुमाळ आणि उपविभागीय अधिकारी वैभव नावडकर यांनी दिली.